महाराष्ट्र पोलीस

जा.क्र. ७९० /माहिती कक्ष/वाचक
पो.अधि.का.कार्या. भंडारा
दि. २८/११/२०१६

प्रेसनोट

## " शहरातील अतिक्रमण विरोधी कारवाईस प्रशासनाकडुन सहकार्याचे अवाहन"

**भंडारा** :– सध्या महसुल, नगरपरिषद, सर्वाजनिक बांधकाम विभाग व पोलीस विभाग यांचे कडुन भंडारा शहरातील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही सुरू असुन, गेल्या ३ दिवसांमध्ये शहरातील त्रिमुर्ती चौक, बसस्थानक, पोस्ट ऑफिस चौक, बडाबाजार, शास्त्रीचौक येथिल अतिक्रमण हटविण्यात आलेले आहे तथापि सदर ठिकाणावर पुन्हा फेरीवाले, व्यावसायिक यांनी आपले स्टॉल, हातगाडया पुन्हा लावुन अतिक्रमण करणे सुरू केले आहे.

भंडारा शहरामध्ये ऑटोरिक्षा, काळीपीवळी सवारी ईत्यादी प्रवाशी वाहतुक करणा–या मोटार वाहनाकरीता जागा किंवा थांबे नेमुण देण्यात आलेले नाहीत. तसेच रस्त्यावरील अतिक्रमणामुळे त्यांना त्यांचे वाहने रस्त्यावर थांबविने भाग पडत असुन, त्याचा रहदारीस अडथळा होत आहे व त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. त्याच प्रमाणे शहरामध्ये फोर व्हिलर, टुव्हिलर यांचे देखील पार्कींगची ठिकाणे/जागा निश्चीत करण्यात आलेल्या नाहीत तसेच बाजारपेठेतील व्यापारी, व्यावसायिक हे त्यांचे दुकानातील माल दुकानाबाहेर रस्त्यावार मांडत असल्याने रस्त्यावर टुव्हिलर पार्कींग करीता जागा मिळत नाही त्यामुळे ट्राफिक जामची समस्या निर्माण होत आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या, मोटार वाहनांचे वाढते प्रमाण व त्यामुळे रहदारीस होत असलेला अडथळा व त्यामुळे निर्माण झालेली मोटार वाहनांची अपघातांची शक्यता याकरीता तात्काळ उपाययोजना व कार्यवाही करणे आवश्यक असल्याने जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीमध्ये शहरातील अतिक्रमणे हटवुन याबाबत उपाययोजना करण्याचा निर्णय सर्व शासकीय विभाग प्रमुखांनी घेतला असुन, अतिक्रमण हटविलेल्या जागेवर –

१. त्रिमुर्ती चौक येथिल रस्त्याच्या पुर्वेकडील अतिक्रमण हटविण्यात आलेली जागा ही सपाटीकरन करून ऑटोरिक्षा, काळीपिवळी सवारी यांना थांबा म्हणुन उपलब्ध करून देण्यात आली आहे तर पश्चिमेकडील मोकळयाजागेवर फेन्सिंग करून सदरची जागा सुरक्षीत करण्यात येणार आहे.

२. बसस्थानक समोरील स्थानिक ऑटोरिक्षाकरीता रस्त्याचे पुर्वेकडील अतिक्रमण हटविण्यात आलेल्या जागेवर ऑटोरिक्षांकरीता थांबा देण्यात आला आहे.

३. पोस्ट ऑफिस चौक येथिल अतिक्रमण हटविण्यात आलेल्या रस्त्याचे पुर्वेकडील महसुल व सार्वजनिक विभागाचे जागेवर टुव्हिलर व फोर व्हिलर पार्कींग करीता जागा देण्यात आली आहे.

४. शहरातील पोस्ट ऑफिस चौक ते गांधी चौक या मुख्य बाजार पेठेच्या मार्गावरिल रहदारीचे नियमनाकरीता पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी दिनांक १५/१०/२०१७ रोजी अधिसुचना जारी केलेली आहे तथापि व्यावसायिकांचे अतिक्रमणामुळे सदर अधिसुचनेची अंमलबजावणी करता आलेली नाही. त्यामुळे सदरचा रस्ता हा 'ना फेरीवाला क्षेत्र' (नो हॉकर्स झोन) म्हणुन जाहीर करण्याची प्रक्रिया नगरपरिषदने सुरू केलेली आहे. सदर मुख्यरस्त्यावरील व्यावसायिकांनी केलेले अतिक्रमण हटवुन सध्यस्थितीत बाजारामध्ये खरेदीकरीता येणा–या नांगरीकांकरीता रस्त्याचे दोन्ही बाजुस टुव्हिलर पार्कींग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

५. यापुढे सदर अतिक्रमण हटविण्यात आलेल्या ठिकाणी पुन्हाँ अतिक्रमण होवुन नये या करीता अतिक्रमण विरोधी पथकाची निर्मीती करण्यात आलेली आहे. सदर पथकाने सुचना देवुनही ज्या व्यापारी अतिक्रमण धारक, फेरीवाले यांनी अतिक्रमण काढुन घेतले नाही अशा एकुण २३ व्यापा–यावर रविवार दिनांक २६/११/२०१७ रोजी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १०२ अन्वये कारवाई केली असुन त्यांचे खटले मा. न्यायालयात पाठविले आहेत.

सदरची अतिक्रमण विरोधी मोहीम ही स्वच्छ, सुदंर व निटनिटक्या भंडारा शहरासाठी आवश्यक असुन सदर मोहीमेला सर्व व्यावसायिक, फेरीवाले, मोटार वाहन चालक व सर्व सामान्य नागरीक यांनी सहकार्य व पांठींबा दयावा असे अवाहन महसुल, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम व पोलीस विभागा मार्फत करण्यात आलेले आहे.

उपविभागीय अधिकारी,
उपविभाग **भंडारा**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.